www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide

Test Booklet Code & Serial No.
प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

**C**

# Paper-II

# PHILOSOPHY

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) .........................................

(Name) .................................................

2. (Signature) .........................................

(Name) .................................................

Seat No. | | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ..............................................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | | |

(To be filled by the Candidate)

## APR - 12224

**Time Allowed : 2 Hours]** **[Maximum Marks : 200**

Number of Pages in this Booklet : **36** Number of Questions in this Booklet : **100**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **100** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper II will be compulsory.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. Use only Blue/Black Ball point pen.
11. Use of any calculator or log table, etc., is prohibited.
12. There is no negative marking for incorrect answers.

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परीक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 100 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनिटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्वीकारू नये.
   (*ii*) पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चुकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पाहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापि, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.
11. कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.
12. चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

APR - 12224/II—C

# Philosophy
## Paper II
# दर्शनशास्त्र
## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 120 Minutes]** **[Maximum Marks : 200**

**Note :** This paper contains **Hundred (100)** multiple choice questions. Each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **शंभर (100)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. J. Krishnamurti highlights human :
   (A) Sensitivity, Novelty, Creativity
   (B) Subjectivity as well as objectivity
   (C) Rationality
   (D) Rationality and objectivity

2. According to Vivekananda, Māyā is a convenient name for the fact of :
   (A) Negation
   (B) Contradiction
   (C) Conjunction
   (D) Separation

3. Both Iqbal and Rādhākrishnan attempted to reform :
   (A) Religions
   (B) Regions
   (C) Sciences
   (D) Languages

1. जे. कृष्णमूर्ती अधोरेखित करतात :
   (A) संवेदनशीलता, अपूर्वता, सर्जनशीलता
   (B) व्यक्तिनिष्ठता आणि वस्तुनिष्ठताही
   (C) बुद्धिप्रामाण्य
   (D) बुद्धिप्रामाण्य व वस्तुनिष्ठता

2. विवेकानंदांच्या मते, माया हे सोयीस्कर नाव आहे वस्तुस्थितीच्या :
   (A) नकारात्मकतेचे
   (B) विसंगतीचे
   (C) संयोगाचे
   (D) वियोगाचे

3. इक्बाल व राधाकृष्णन यांनी कोणत्या क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला ?
   (A) धर्म
   (B) प्रांत
   (C) विज्ञाने
   (D) भाषा

www.prepp.in



4. According to K. C. Bhattacharya, philosophical judgements are :

(A) Literal

(B) Symbolic

(C) Partial

(D) Uncertain

5. Match the columns :

**List I**

(*a*) Mahatma Gandhi

(*b*) K. C. Bhattacharya

(*c*) Iqbal

(*d*) J. Krishnamurti

**List II**

(*i*) I am the creative truth

(*ii*) Truth is God

(*iii*) Truth is a pathless land

(*iv*) Truth is absolute as known

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*iv*) | (*i*) | (*ii*) | (*iii*) |
| (B) | (*ii*) | (*i*) | (*iv*) | (*iii*) |
| (C) | (*ii*) | (*iv*) | (*iii*) | (*i*) |
| (D) | (*ii*) | (*iv*) | (*i*) | (*iii*) |

4. के. सी. भट्टाचार्यांच्या म्हणण्यानुसार तत्त्वज्ञानातील निर्धारणे कशी असतात ?

(A) वाच्यार्थपूर्ण

(B) प्रतीकात्मक

(C) खंडात्मक

(D) अनिश्चित

5. जोड्या जुळवा :

**गट पहिला**

(*a*) महात्मा गांधी

(*b*) के. सी. भट्टाचार्य

(*c*) इक्बाल

(*d*) जे. कृष्णमूर्ती

**गट दुसरा**

(*i*) मी सर्जनशील सत्य

(*ii*) सत्य हा ईश्वर

(*iii*) सत्य ही पंथविहीन भूमी

(*iv*) सत्य हे जाणलेले केवल तत्त्व

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*iv*) | (*i*) | (*ii*) | (*iii*) |
| (B) | (*ii*) | (*i*) | (*iv*) | (*iii*) |
| (C) | (*ii*) | (*iv*) | (*iii*) | (*i*) |
| (D) | (*ii*) | (*iv*) | (*i*) | (*iii*) |

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



6. In his book "Brahmananche Kasab" Jyotiba Phule exposed the issue of :
(A) Exploitation by the Priest class
(B) Exploitation by Rulers
(C) Exploitation by the British
(D) Exploitation by the traders

7. S. Rādhākrishnan and Iqbal highlight the significance of :
(A) Theism and Atheism
(B) Intellect and Intuition
(C) Scepticism and Agnosticism
(D) Gnosticism and Agnosticism

8. What, according to Sree Narayan Guru, does Spirituality mean ?
(A) Service to Nation
(B) Service to Weaker Section
(C) Service to farmers
(D) Service to mankind

9. According to Gandhi, the ultimate aim of Satyagraha is :
(A) Eradication of Bad Government
(B) Eradication of Evil tendencies
(C) Eradication of Bad person
(D) Eradication of enemies

6. "ब्राह्मणांचे कसब" या आपल्या पुस्तकात ज्योतिबा फुले यांनी ................ या समस्येवर प्रकाश टाकला आहे.
(A) पुरोहितवर्गाने केलेली पिळवणूक
(B) राज्यकर्त्यांनी केलेली पिळवणूक
(C) ब्रिटिशांनी केलेली पिळवणूक
(D) व्यापारीवर्गाने केलेली पिळवणूक

7. स. राधाकृष्णन व इक्बाल कोणाचे महत्त्व अधोरेखित करतात ?
(A) ईश्वरवाद व निरीश्वरवाद
(B) बुद्धिमत्ता व अंतर्ज्ञान
(C) संशयवाद व अज्ञेयवाद
(D) ज्ञेयवाद व अज्ञेयवाद

8. श्रीनारायण गुरू यांच्या मतानुसार आध्यात्मिकता म्हणजे :
(A) राष्ट्रसेवा
(B) दुर्बल घटकांची सेवा
(C) शेतकऱ्यांची सेवा
(D) मानवजातीची सेवा

9. गांधींच्या मतानुसार सत्याग्रहाचे अंतिम उद्दिष्ट :
(A) वाईट सरकारचे उच्चाटन
(B) दुष्प्रवृत्तींचे उच्चाटन
(C) वाईट व्यक्तीचे उच्चाटन
(D) शत्रूचे उच्चाटन

www.prepp.in



10. Jyotiba Phule was greatly influenced by Thomas Paine's idea of :
    (A) Rights of women
    (B) Rights of farmers
    (C) Rights of untouchables
    (D) Rights of man

11. According to Frege, the sense of a sentence is the :
    (A) Object it denotes
    (B) Truth-value it bears
    (C) Thought it expresses
    (D) True object

12. In Moore's view, which among the following statements is the most basic proposition ?
    (A) Material substance exists
    (B) Mental substance exists
    (C) God exists
    (D) Body exists

13. Wittgenstein in his Philosophical Investigation shows the apparent uniformity of words with the example of :
    (A) Tool box
    (B) Locomotive engine
    (C) Five red apples
    (D) Pictorial model

10. ज्योतिबा फुले यांच्यावर थॉमस पेन यांच्या ………… या कल्पनेचा प्रचंड प्रभाव होता.
    (A) स्त्रियांचे अधिकार
    (B) शेतकऱ्यांचे अधिकार
    (C) अस्पृश्यांचे अधिकार
    (D) मानवाचे आधिकार

11. फ्रेगच्या मते, एखाद्या विधानाचा अर्थ म्हणजे :
    (A) निर्देशित पदार्थ
    (B) त्याचे सत्यतामूल्य
    (C) त्यातून व्यक्त होणारा विचार
    (D) सत्य पदार्थ

12. मूरच्या दृष्टिकोनानुसार, खालीलपैकी कोणते विधान अधिकतम पायाभूत विधान आहे ?
    (A) भौतिक द्रव्य असतो
    (B) मानसिक द्रव्य असतो
    (C) ईश्वर असतो
    (D) देह असतो

13. 'फिलॉसफिकल इन्व्हेस्टिगेशन' मध्ये विट्गेन्स्टाइन शब्दांची द्रश्यमान एकरूपता कोणत्या उदाहरणाने स्पष्ट करतात ?
    (A) उपकरणपेटी
    (B) रेल्वे इंजिन
    (C) पाच लाल सफरचंदे
    (D) चित्रमय प्रारूप

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



14. According to Ayer, the nature of knowledge is :
   (A) A unique mental state
   (B) Dispositional
   (C) Verbal
   (D) Intuitional

15. Which of the following specific views is problematic according to Quine ?
   (A) Each statement can be confirmed or disconfirmed in isolation
   (B) Each statement cannot be confirmed or disconfirmed in isolation
   (C) Truth value of empirical statements can be redistributed
   (D) Empiricism is not a consistent view with the theory of meaning.

16. Husserl's aim was to discover the foundations of .................... through Phenomenology.
   (A) Mathematics
   (B) Logic
   (C) Knowledge and Experience
   (D) Metaphysics

14. एयरच्या मते, ज्ञानाचे स्वरूप असते :
   (A) एक अनन्यसाधारण मानसिक अवस्था
   (B) अभिवृत्तीमय
   (C) वाचिक
   (D) अंतर्ज्ञानात्मक

15. क्वाइनच्या मते, खालीलपैकी कोणता विशिष्ट दृष्टिकोन समस्यात्मक आहे ?
   (A) प्रत्येक विधान स्वतंत्रपणे दुजोरा देण्याजोगे किंवा दुजोरा न देण्याजोगे असते
   (B) प्रत्येक विधान स्वतंत्रपणे दुजोरा देण्याजोगे किंवा दुजोरा न देण्याजोगे नसते
   (C) आनुभविक विधानांचे सत्यतामूल्य पुनर्वितरित करता येते
   (D) अनुभववाद हा अर्थाच्या उपपत्तीशी सुसंगत दृष्टिकोन नव्हे

16. ह्यूसेर्लच्या उद्दिष्टानुसार मानसघटनाशास्त्राच्या योगे कोणाची पायाभूत तत्त्वे शोधली जातात ?
   (A) गणित
   (B) तर्कशास्त्र
   (C) ज्ञान आणि अनुभव
   (D) सद्वस्तु मीमांसा

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



17. According to Heidegger, the Dasein is :
 (A) Philosophical subject
 (B) Existing Being
 (C) Phenomenological self
 (D) Subjective being

18. Sartre's bad faith is a/an :
 (A) Unconscious lie
 (B) Conscious lie
 (C) Spoken lie
 (D) Censored lie

19. William James' theory of truth suggests that a proposition is true if it can be :
 (A) Verified
 (B) Assimilated and validated
 (C) Corroborated and verified
 (D) Assimilated, validated, Corroborated and verified

20. Nietzsche's approach to modern western philosophy provokes him to claim that :
 (A) World is nothing but appearance
 (B) The real world is 'the only truth'
 (C) The 'real' world is a lie
 (D) World is both appearance and reality

17. हायडेगरच्या मते, 'डासेन' म्हणजे :
 (A) तात्त्विक विषयी/तत्त्वज्ञानात्मक विषयी
 (B) अस्तित्वशील सता
 (C) मानसघटनाशास्त्रीय 'स्व'
 (D) विषयीभावी सत्ता

18. सार्त्रची अपश्रद्धा म्हणजे :
 (A) अबोध असत्य
 (B) बोधात्मक असत्य
 (C) वाचिक असत्य
 (D) सेन्सॉर्ड असत्य

19. विल्यम जेम्सची सत्यता उपपत्ती असे सुचविते की विधान सत्य असते जर ते :
 (A) सत्यापित असेल
 (B) समाविष्ट व प्रमाणित असेल
 (C) पुष्टिदायी व सत्यापित असेल
 (D) समाविष्ट, प्रमाणित, पुष्टिदायी व प्रमाणित असेल

20. नित्शेचा आधुनिक पाश्चात्य तत्त्वज्ञानाविषयक दृष्टिकोन त्यास नेमके काय मानावयास उद्युक्त करतो ?
 (A) जग हा केवळ आभास होय
 (B) वास्तव जग हेच 'एकमेव सत्य' होय
 (C) 'वास्तव' जग हे एक 'असत्य' होय
 (D) जग हे आभास आहे व वास्तवताही होय

21. The two administrative pillars in the constituents of state according to Kautilya are :
   (A) Swami and Purohita
   (B) Swami and Amatya
   (C) Amatya and Adhikari
   (D) Swami and Adhikari

22. The state policy articulated by Kautilya is based on :
   (A) Acquisition of new dominion only
   (B) Preservation of own dominion only
   (C) Acquisition and preservation of dominion
   (D) Warfare for increasing the treasury

23. The theoretical roots of Sarvodaya can be traced back to :
   (A) the Vedic and Vedantic thought
   (B) the Puranas
   (C) the Manusmriti
   (D) the Arthashastra

21. कौटिल्याच्या मतानुसार राज्याच्या रचनेतील दोन प्रशासकीय आधारस्तंभ म्हणजे :
   (A) स्वामी व पुरोहित
   (B) स्वामी व अमात्य
   (C) अमात्य व अधिकारी
   (D) स्वामी व अधिकारी

22. कौटिल्याने मांडलेले राजकीय धोरण यावर आधारित आहे :
   (A) नवीन भूप्रदेशाचे संपादन
   (B) स्वत:च्या भूप्रदेशाचे जतन
   (C) भूप्रदेशाचे संपादन व संरक्षण
   (D) खजिन्यात भर घालण्यासाठी युद्धखोरी

23. सर्वोदयाची सैद्धान्तिक मुळे ................ यामध्ये आढळतात.
   (A) वैदिक व वेदान्ती विचारधारा
   (B) पुराणे
   (C) मनु:स्मृती
   (D) अर्थशास्त्र

www.prepp.in



24. According to Kautilya, the four-fold source of the State law contains :
    (A) Dharma, Vyavahara, Samstha and Nyaya
    (B) Swami, Vyavahara, Samstha and Nyaya
    (C) Ishwara, Vyavahara, Samstha and Nyaya
    (D) Paurajana, Vyavahara, Samstha and Nyaya

25. Swadeshi, according to Gandhi's conception of it, is opposed to which one of the following ?
    (A) Mill-made cloth
    (B) Traditional techniques
    (C) Manufacturing machines in the country
    (D) Labor saving machines

26. According to both Arthashastra and Mahabharata, the activity of the state is related to human life with respect to :
    (A) Social, economic and religious aspects
    (B) Social and economic aspects
    (C) Social and religious aspects
    (D) Only legal aspect

24. कौटिल्याच्या मतानुसार राज्याच्या कायद्याच्या चतुर्विध स्रोतांमध्ये ................ यांचा समावेश होतो.
    (A) धर्म, व्यवहार, संस्था व न्याय
    (B) स्वामी, व्यवहार, संस्था व न्याय
    (C) ईश्वर, व्यवहार, संस्था व न्याय
    (D) पॉरजन, व्यवहार, संस्था व न्याय

25. गांधींच्या 'स्वदेशी' संकल्पनेचा पुढीलपैकी कशाशी विरोध आहे ?
    (A) गिरणीतील कापड
    (B) पारंपारिक तंत्रे
    (C) देशात यंत्रांची निर्मिती करणे
    (D) श्रम वाचवणारी यंत्रे

26. अर्थशास्त्र व महाभारत या दोहोंच्या मतानुसार राज्यव्यवहारांचा मानवी जीवनाशी असणारा संबंध या पैलूंशी निगडित आहे :
    (A) सामाजिक, आर्थिक व धार्मिक
    (B) सामाजिक व आर्थिक
    (C) सामाजिक व धार्मिक
    (D) केवळ संवैधानिक

www.prepp.in



27. According to Gandhi, which of the following is not an assumption underlying the doctrine of satyagraha ?
    (A) It begins and ends with civil disobedience
    (B) It requires rendering heart discipline to the commander
    (C) It requires being prepared to lose everything that one may possess, including life
    (D) Tapascharya is the essence of satyagraha

28. Bhishma declares a king to be a maker of his epoch through :
    (A) His descend from Divine origin
    (B) His supreme social hierarchy
    (C) Degree of fulfillment of his functions
    (D) Degree of his application of dandaniti

29. In the state policy of Bhishma, there is focus on :
    (A) Rajadharma and Dandaniti
    (B) Rajadharma and Nitidharma
    (C) Dandaniti and Nitidharma
    (D) Rajadharma and Yuddhashastra

27. गांधींच्या मतानुसार पुढीलपैकी कोणते 'सत्याग्रह' संकल्पनेचे गृहीततत्त्व नाही ?
    (A) त्याचा आरंभ व अंत सविनय कायदेभंगाने होतो
    (B) त्यामध्ये सेनापतीला हृदयस्थ शिस्त प्रदान करणे आवश्यक आहे
    (C) त्यामध्ये जीवनासहीत सर्वच गमावण्याची तयारी असणे आवश्यक आहे
    (D) तपश्चर्या हे सत्याग्रहाचे सार आहे

28. भीष्मांनी म्हटल्यानुसार राजा या घटकामुळे त्याच्या युगाचा कर्ता ठरवला जाऊ शकतो :
    (A) त्याचे दैवी अवरोहण
    (B) त्याची सर्वोच्च सामाजिक श्रेणी
    (C) त्याच्या कार्यपूर्ततेची पातळी
    (D) त्याच्या दंडनीतीच्या उपयोगजनाची पातळी

29. भीष्मांच्या राज-धोरणाचा भर यावर आहे :
    (A) राजधर्म व दंडनीती
    (B) राजधर्म व नीतिधर्म
    (C) दंडनीती व नीतिधर्म
    (D) राजधर्म व युद्धशास्त्र

Prepp
Your Personal Exams Guide



30. According to Kautilya, the essence of governance is :
    (A) Kosha
    (B) Danda
    (C) Swami
    (D) Mitra

31. In *The Republic*, Socrates, tells .................. that justice is the same for both individual and state.
    (A) Glaucon
    (B) Cephalus
    (C) Adeimantus
    (D) Polemarchus

32. Which among the following is a reason for war in the Hobbesian state of nature ?
    (A) Competition for same goods
    (B) Calamities
    (C) Fear of God
    (D) Lack of Natural law

33. Dialectical movement is the coexistence of two ................. sides.
    (A) Parallel
    (B) Classes
    (C) Complimentary
    (D) Contradictory

30. कौटिल्याच्या मतानुसार प्रशासनाचे सार म्हणजे :
    (A) कोष
    (B) दंड
    (C) स्वामी
    (D) मित्र

31. रिपब्लीक या ग्रंथात, .................. यांना सॉक्रेटिस सांगतात की व्यक्ती आणि राज्य या दोहोंसाठी न्याय समान असतो.
    (A) ग्लॉकान
    (B) सेफेलस
    (C) ॲडिमान्टस
    (D) पोलीमार्कस्

32. हॉब्सप्रणित निसर्गाच्या राज्यातील युद्धाचे कारण खालीलपैकी कोणते आहे ?
    (A) समान वस्तुसाठी चढ़ाओढ़
    (B) आपदा
    (C) ईश्वराचे भय
    (D) नैसर्गिक नियमाचा अभाव

33. द्वन्द्वात्मक चळवळ म्हणजे दोन .............. पक्षांचे सहअस्तित्व होय.
    (A) समांतर
    (B) वर्ग
    (C) परस्पर पूरक
    (D) व्याघाती

www.prepp.in



34. In the essay, "What is Equality Part-II : Equality of Resources", Ronald Dworkin considers :

(A) The claims of equality and welfare

(B) The claims of treating people as equaly

(C) The competing claims and equality of resources

(D) The claim of equality and resources

35. According to Amartya Sen, a theory of justice has to accommodate :

(A) Homogenous virtues

(B) Social unity

(C) Plurality of reasons

(D) Ambiguity of morality

36. According to Marx, in capitalist societies, labor is expropriated and transmuted into :

(A) Exchange value

(B) Value

(C) Work

(D) Industrialization

34. ''व्हॉट इज इक्वॅलिटी-पार्ट टू : इक्वॅलिटी ऑफ रिसोर्सेस'' या निबंधात रोनाल्ड डवार्किन यांनी .................. याचा विचार केला आहे.

(A) समानता आणि कल्याणविषयीचे दावे

(B) लोकांना समानतेची वागणूक देण्याविषयीचे दावे

(C) समानता आणि संसाधनांविषयीचे परस्पर-विरोधी दावे

(D) समानता आणि संसाधनांविषयीचे दावे

35. अमर्त्य सेन यांच्या मतानुसार, न्याय सिद्धांताने .................. ला सामावून घ्यायला पाहिजे.

(A) सजातीय सद्‌गुण

(B) सामाजिक एकता

(C) समर्थक कारणांची अनेकता

(D) नीतिमत्तेची संदिग्धता

36. मार्क्सच्या मते भांडवलशाही समाजरचनेत, मनुष्यापासून श्रम हिरावून ते परात्म करून त्याचे परिवर्तन .............. यात करण्यात येते.

(A) विनिमय मूल्य

(B) मूल्य

(C) कार्य

(D) औद्योगिकीकरण

www.prepp.in



37. The charge of misogyny against Aristotle is based on his view that women lack :

(A) Authority

(B) Emotion

(C) Sincerity

(D) Reason

38. In feminist discourse, the term "gender" has the following two cannotations :

(A) Physiological and biological

(B) Male and female

(C) Sexual and asexual

(D) Cultural and psychological

39. According to Charles Taylor, we have a continuing politics of equal recognition on the .................. .

(A) Private plane

(B) Social plane

(C) Political plane

(D) Cultural plane

37. ॲरिस्टॉटल स्त्रीद्वेष्टा असल्याचा आरोप त्याच्या या मतावर आधारित आहे की स्त्रियांमध्ये याचा अभाव असतो ..................... .

(A) अधिकार

(B) भावना

(C) प्रामाणिकपणा

(D) तर्कबुद्धी

38. स्त्रीवादी विचारव्यूहात 'लिंगभाव' या पदाचे हे दोन प्रकारचे गर्भितार्थ आहेत.

(A) शरीरशास्त्रीय आणि जीवशास्त्रीय

(B) पुरुष आणि स्त्री

(C) लैंगिक आणि अलैंगिक

(D) सांस्कृतिक आणि मानसशास्त्रीय

39. चार्ल्स टेलरच्या मताप्रमाणे, खालील स्तरावर समान मान्यतेचे राजकारण सतत चालू असते :

(A) खाजगी स्तर

(B) सामाजिक स्तर

(C) राजकीय स्तर

(D) सांस्कृतिक स्तर

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



40. Which of the following is considered as Isaiah Berlin's influential essay of twentieth century political philosophy ?
    - (A) Two Concepts of Liberty
    - (B) Equality, Value and Merit
    - (C) Justice and the Good
    - (D) Theories of Justice

41. An argument in which a universal conclusion is derived from particular premises is called :
    - (A) Valid deductive argument
    - (B) Good inductive argument
    - (C) Deductive argument
    - (D) Inductive argument

42. Which among the following is not a law of thought ?
    - (A) Law of Identity
    - (B) Law of Non-contradiction
    - (C) Law of Excluded middle
    - (D) Law of Uniformity of Nature

43. 'Many fruits are sweet' is an example of :
    - (A) Universal affirmative proposition
    - (B) Universal negative proposition
    - (C) Particular affirmative proposition
    - (D) Particular negative proposition

40. विसाव्याशतकातील राजकीय तत्त्वज्ञानावर कोणता निबंध इसाया बर्लिनचा प्रभावशाली निबंध मानला जातो ?
    - (A) स्वातंत्र्याच्या दोन संकल्पना
    - (B) समानता, मूल्य आणि गुणवत्ता
    - (C) न्याय आणि शुभ
    - (D) न्यायविषयक उपपत्ती

41. विशेषवाची आधारविधानांतून सर्ववाची निष्कर्ष ज्या युक्तिवादात काढला जातो, त्याला असे म्हणतात :
    - (A) वैध नैगमनिक युक्तिवाद
    - (B) उचित वैगमनिक युक्तिवाद
    - (C) नैगमनिक युक्तिवाद
    - (D) वैगमनिक युक्तिवाद

42. पुढीलपैकी कोणता विचाराचा नियम नाही ?
    - (A) तादात्म्याचा नियम
    - (B) अव्याघाताचा नियम
    - (C) वर्जित मध्यतेचा नियम
    - (D) निसर्गाच्या एकरूपतेचा नियम

43. ''बरीच फळे मधुर आहेत' हे उदाहरण आहे—
    - (A) सर्ववाची होकारार्थी विधानाचे
    - (B) सर्ववाची नकारार्थी विधानाचे
    - (C) विशेषवाची होकारार्थी विधानाचे
    - (D) विशेषवाची नकारार्थी विधानाचे

www.prepp.in



44. Two categorical propositions having the same subject and the same predicate are ............., if they cannot both be true and cannot both be false are called .................
(A) Contradictory
(B) Contrary
(C) Sub-contrary
(D) Subalternation

45. In a valid categorical syllogism, the term that must be distributed at least once is the premises is :
(A) Major term
(B) Minor term
(C) Middle term
(D) Quantifier

46. Recognized the rule expressed by the following statement-form :

$$(p \supset q) \equiv (\sim q \supset \sim p)$$

(A) Exportation
(B) Association
(C) Transposition
(D) Distribution

44. समान उद्देशपद आणि समान विधेयपद असणाऱ्या दोन निरुपाधिक विधाने जर एकाचवेळी सत्य असू शकत नसतील आणि एकाचवेळी असत्यही असू शकत नसतील तर त्यांना असे म्हणतात :
(A) व्याघात
(B) विरोधी
(C) उप-विरोधी
(D) उपलक्षितता

45. वैध निरुपाधित संविधानात आधारविधानात एकदा तरी वितरित असलेच पाहिजे असे पद म्हणजे :
(A) साध्य पद
(B) पक्ष पद
(C) मध्य पद
(D) संख्यापक

46. पुढील विधानबंधातील नियम ओळखा :

$$(p \supset q) \equiv (\sim q \supset \sim p)$$

(A) बहि:सरण
(B) सहसंबंधन
(C) व्यंजन व्यतिरेक
(D) वितरण

47. If a contradictory is denied resulting propositional form is :

(A) Contradictory

(B) Tautology

(C) Contingent

(D) Probable

48. Match List I and List II and select the correct answer from the codes given below :

**List I**

(*a*) Rule of Universal Instantiation (UI)

(*b*) Rule of Universal Generalization (UG)

(*c*) Rule of Existential Instantiation (EI)

(*d*) Rule of Existential Generalization (EG)

**List II**

(*i*) (x) (ϕx) ∴ ϕ*v*

(*ii*) (∃x) (ϕx) ∴ ϕ*a*

(*iii*) ϕ*v* ∴ (∃x) (ϕx)

(*iv*) ϕ*y* ∴ (x) (ϕx)

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*i*) | (*iii*) | (*iv*) | (*ii*) |
| (B) | (*iv*) | (*ii*) | (*iii*) | (*i*) |
| (C) | (*i*) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) |
| (D) | (*i*) | (*iv*) | (*ii*) | (*iii*) |

47. जर व्याघाताचा निषेध केला तर निष्पादित होणारा विधानबंध असा असतो :

(A) व्याघात/सर्वत: असत्य विधानबंध

(B) सर्वत: सत्य

(C) नैमित्तिकतया सत्यासत्य

(D) संभाव्य

48. सूची I आणि सूची II यांच्या जोड्या जुळवा आणि दिलेल्या संकेतांतून योग्य पर्याय निवडा :

**सूची I**

(*a*) सार्विक उदाहरणीकरणाचा नियम

(*b*) सार्विक सामान्यीकरणाचा नियम

(*c*) अस्तित्वाची उदाहरणीकरणाचा नियम

(*d*) अस्तित्वाची सामान्यीकरणाचा नियम

**सूची II**

(*i*) (x) (ϕx) ∴ ϕ*v*

(*ii*) (∃x) (ϕx) ∴ ϕ*a*

(*iii*) ϕ*v* ∴ (∃x) (ϕx)

(*iv*) ϕ*y* ∴ (x) (ϕx)

**संकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*i*) | (*iii*) | (*iv*) | (*ii*) |
| (B) | (*iv*) | (*ii*) | (*iii*) | (*i*) |
| (C) | (*i*) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) |
| (D) | (*i*) | (*iv*) | (*ii*) | (*iii*) |

www.prepp.in



49. From the set of axioms and proved theorems, if it is impossible to derive both a statement and its negation then that axiomatic system is said to be :
    (A) Independent
    (B) Consistent
    (C) Complete
    (D) Complex

50. The fallacy committed in the following argument is .......... "water extinguishes fire. Oxygen is a part of water. Therefore oxygen will extinguish fire."
    (A) Fallacy of Division
    (B) Fallacy of Composition
    (C) Argument ad Ignorantiam
    (D) Arguing in circle

51. Which of the following statements best describes the nature of Applied Ethics ?
    (A) It attempts to answer how people should act in specific situations
    (B) It is the direct application of ethical theories regardless of real-life circumstances
    (C) It raises fundamental questions about the very nature of ethics and ethical theories
    (D) It attempts to understand and resolve moral problems that arise in some domains of practical life

49. मूलाधारांचा संच आणि सिद्ध केलेल्या प्रमेयाच्या आधारे जर विधान आणि त्याचा निषेध दोन्हीही निष्पादित करणे अशक्य असेल तर ती बीजानुमान प्रणाली असते :
    (A) स्वतंत्र
    (B) सुसंगत
    (C) संपूर्ण
    (D) व्यामिश्र

50. पुढील युक्तिवादात झालेला तर्कदोष आहे : "पाणी आग विझविते. ऑक्सिजन हा पाण्याचा एक घटक आहे. म्हणून आक्सिजननेही आग विझेल".
    (A) विभाजन तर्कदोष
    (B) समूहाभास तर्कदोष
    (C) लोकाज्ञान तर्कदोष
    (D) चक्रापत्ती तर्कदोष

51. खालीलपैकी कोणते विधान उपयोजित नीतिशास्त्राचे उत्तम प्रकारे वर्णन करते ?
    (A) विशिष्ट परिस्थितीत माणसांनी कसे वागावे याचे उत्तर देण्याचा ते प्रयत्न करते
    (B) प्रत्यक्ष जीवनातील घटनांच्या निरपेक्ष ते नैतिक सिद्धांतांचे थेट उपयोजन करते
    (C) नीतिशास्त्र आणि नीती सिद्धांतांच्या स्वरूपाच्याच संदर्भात ते मूलभूत प्रश्न उपस्थित करते
    (D) ते व्यावहारिक जीवनाच्या काही क्षेत्रांमधे उद्‌भवणाऱ्या नैतिक समस्या समजून घेण्याचा व सोडविण्याचा प्रयत्न करते

Prepp
Your Personal Exams Guide



52. Which of the following cannot be an illustration of 'technology' ?
    (A) Using sticks to consume foods
    (B) Making and using of tools
    (C) Designing a spear for fishing
    (D) Processing of plastic recycling

53. Democratization of technology refers to :
    (A) Making technology free
    (B) Making technology accessible
    (C) Making technological knowledge free and accessible
    (D) Making technological knowledge easy and accessible

54. Bioethics does not deal with issues in the domain of :
    (A) Nursing
    (B) Healthcare
    (C) Veterinary
    (D) Personal hygiene

55. The Hippocratic Oath of the classical Greece represents which of the following approaches to bioethics ?
    (A) Scientific
    (B) Clinical
    (C) Economic
    (D) Legal

52. खालीलपैकी कोणते उदाहरण तंत्रज्ञानाचे असू शकत नाही ?
    (A) खाद्यपदार्थांच्या आस्वादासाठी काड्यांचा वापर करणे
    (B) औजारे तयार करणे व त्यांचा वापर करणे
    (C) मासेमारीसाठी भाला तयार करणे
    (D) पुनर्वापरासाठी प्लॅस्टिकवर प्रक्रिया करणे

53. तंत्रज्ञानाचे लोकशाहीकरण म्हणजे :
    (A) तंत्रज्ञान मोफत करणे
    (B) तंत्रज्ञान सहजप्राप्य करणे
    (C) तंत्राविषयक ज्ञान मोफत व सहजप्राप्य करणे
    (D) तंत्राविषयक ज्ञान सोपे व सहजप्राप्य करणे

54. खालीलपैकी कोणत्या क्षेत्रातील समस्यांचा विचार जैवनीतिशास्त्र करत नाही ?
    (A) शुश्रूषा सेवा
    (B) आरोग्य सेवा
    (C) पशू चिकित्सा
    (D) वैयक्तिक शुचिता

55. ग्रीसमधील हिपोक्रॅटसची शपथ जैवनीतिशास्त्रातील खालीलपैकी कोणत्या दृष्टिकोनाचे प्रतिनिधित्व करते ?
    (A) शास्त्रीय
    (B) वैद्यकीय
    (C) अर्थशास्त्रीय
    (D) कायदेशीर

www.prepp.in



56. What is the difference between the conservative and liberal arguments in the context of abortion ?

(A) They differ on the stages in which abortion is permissible

(B) Their views on viability of the fetus are different

(C) The former is based on the humanness of the fetus and the latter on capacities or lack of capacities of the fetus

(D) The former is based on the capacities or lack of capacities of the fetus and the latter is based on the humanness of the fetus

57. The ethical theory that moral obligations extends to all living things is :

(A) Biocentrism

(B) Ecocentrism

(C) Anthropocentrism

(D) Psychocentrism

56. गर्भपाताच्या संदर्भात पुराणमतवादी व उदारमतवादी यांच्यातील फरक कोणता ?

(A) कोणत्या टप्प्यात गर्भपात करण्याची अनुमती देण्यात यावी याबद्दलची त्यांची मते भिन्न आहेत

(B) गर्भाच्या तग धरण्याच्या क्षमतेविषयीची त्यांची मते भिन्न आहेत

(C) पुराणमतवाद्यांचा विचार, गर्भाच्या मानव असण्यावर आधारित असून उदारमतवाद्यांचा विचार गर्भाच्या असलेल्या व नसलेल्या क्षमतांवर आधारित आहे

(D) उदारमतवाद्यांचा विचार गर्भाच्या मानव असण्यावर आधारित असून पुराणमतवाद्यांचा विचार गर्भाच्या असलेल्या व नसलेल्या क्षमतांवर आधारित आहे

57. नैतिक कर्तव्ये सर्व जीवांप्रत बजावली जायला हवीत हा नैतिक सिद्धांत म्हणजे :

(A) जैवकेंद्रिततावाद

(B) पर्यावरणकेंद्रिततावाद

(C) मानवकेंद्रिततावाद

(D) मानसकेंद्रिततावाद

www.prepp.in



58. Withholding artificial life support such as a ventilator or feeding tube at the patient's request is an illustration of :

(A) Active voluntary euthanasia

(B) Passive voluntary euthanasia

(C) Active involuntary euthanasia

(D) Passive involuntary euthanasia

59. In the ethical sequence propounded by Aldo Leopold, land ethics falls under the :

(A) First element

(B) Second element

(C) Third element

(D) Primary element

60. What is the primary goal of philosophical counseling ?

(A) Diagnosing mental illnesses

(B) Providing emotional support

(C) Applying philosophical principles to address life issues

(D) Administering therapeutic drugs

58. व्हेंटिलेटर किंवा अन्नासाठीच्या नव्यांसारखे रुग्णाला जीवंत ठेवण्याचे कृत्रिम उपाय रुग्णाच्या विनंतीवरून अवलंबण्याचे थांबवणे हे खालीलपैकी कसले उदाहरण आहे ?

(A) सक्रिय ऐच्छिक दयामरण

(B) निष्क्रिय ऐच्छिक दयामरण

(C) सक्रिय अनैच्छिक दयामरण

(D) निष्क्रिय अनैच्छिक दयामरण

59. अल्डो लिओपोल्ड प्रणीत नैतिक क्रमवारीनुसार भूनीतिशास्त्र खालीलपैकी कोणत्या प्रकारात समाविष्ट होते ?

(A) पहिला घटक

(B) दुसरा घटक

(C) तिसरा घटक

(D) प्राथमिक घटक

60. तात्त्विक समुपदेशनाचा प्राथमिक उद्देश काय ?

(A) मानसिक रोगाचे निदान करणे

(B) भावनिक आधार देणे

(C) जीवनातील प्रश्न सोडवण्यासाठी तात्त्विक सूत्रांचा वापर करणे

(D) उपचारात्मक औषधांचा वापर करणे

www.prepp.in



61. Match the pairs :

**Name of the system**

(*i*) Sãn̂khya

(*ii*) Vedānta

(*iii*) Nyāya

(*iv*) Pūrvmīmāmsā

**Name of the founder/ Sūtrakāra**

(*a*) Jaimini

(*b*) Kapila

(*c*) Bādarāyana

(*d*) Akṣapāda

Choose the correct option :

| | (*i*) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*b*) | (*c*) | (*d*) | (*a*) |
| (B) | (*c*) | (*b*) | (*d*) | (*a*) |
| (C) | (*b*) | (*d*) | (*c*) | (*a*) |
| (D) | (*b*) | (*a*) | (*d*) | (*c*) |

61. जोड्या जुळवा :

**दर्शनाचे नाव**

(*i*) सांख्य

(*ii*) वेदान्त

(*iii*) न्याय

(*iv*) पूर्वमीमांसा

**संस्थापकाचे/सूत्रकाराचे नाव**

(*a*) जैमिनी

(*b*) कपिल

(*c*) बादरायण

(*d*) अक्षपाद

योग्य पर्याय निवडा :

| | (*i*) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*b*) | (*c*) | (*d*) | (*a*) |
| (B) | (*c*) | (*b*) | (*d*) | (*a*) |
| (C) | (*b*) | (*d*) | (*c*) | (*a*) |
| (D) | (*b*) | (*a*) | (*d*) | (*c*) |

62. According to Katha-Upaniṣad Yama granted three boons to Naciketas. Naciketas did not ask the following boon :
(A) Let Gautama be pleased in mind and forget his anger against Naciketas
(B) The fire by which heaven is gained should be known to Naciketas
(C) Naciketas should live as many years as he chooses and attain heaven after death
(D) Some say the soul exists after death of a man; others say it does not exist. Naciketas should like to know this as instructed by Yama

63. According to the revised view of Cārvākas soul is identical with :
(A) four gross elements
(B) body
(C) body qualified by consciousness
(D) sense organs

64. Following systems do not accept Verbal Testimony as an independent pramāṇa :
(A) Cārvāka, Buddhism, Jainism
(B) Cārvāka, Buddhism, Vaiśeṣika
(C) Cārvāka, Vaiśeṣika, Nyāya
(D) Cārvāka, Buddhism, Sāṅkhya

62. कठ–उपनिषदानुसार यमानने नचिकेताला तीन वर देऊ केले. नचिकेताने पुढीलवर मागितला नाही—
(A) गौतमाने मनाने सुखी व्हावे आणि नचिकेतावरील राग विसरावा
(B) ज्या अग्नीने स्वर्गप्राप्ती होते, त्याचे नचिकेताला ज्ञान व्हावे
(C) नचिकेताने हवी तितकी वर्षे जगावे व मेल्यावर त्याला स्वर्ग मिळावा
(D) काहीजण म्हणतात माणूस मेल्यावर आत्मा अस्तित्वात असतो तर दुसरे म्हणतात की आत्मा अस्तित्वात नसतो. त्याचे ज्ञान नचिकेताला यमाच्या उपदेशातून मिळावे

63. चार्वाकांच्या सुधारित दृष्टिकोनानुसार आत्मा हा खालील गोष्टीशी एकरूप असतो :
(A) चार महाभूते
(B) शरीर
(C) चैतन्यविशिष्ट शरीर
(D) ज्ञानेंद्रिये

64. खालील दर्शने शब्दप्रमाण हे स्वतंत्र प्रमाण म्हणून स्वीकारत नाहीत :
(A) चार्वाक, बौद्ध, जैन
(B) चार्वाक, बौद्ध, वैशेषिक
(C) चार्वाक, वैशेषिक, न्याय
(D) चार्वाक, बौद्ध, सांख्य

www.prepp.in



65. What can be the examples of five-sensed mobile Jīvas according to Jainism ?
(A) Microorganisms
(B) Ants
(C) Worms
(D) Human beings

66. Match the pairs :

**Four causal categories**

(1) Only creator, not created
(2) Creator as well as created
(3) Only created
(4) Neither creator nor created

**Sāñkhya principles which come under it**

(*a*) Puruṣa
(*b*) Class of 16 : Five gross elements, five senses, five motor organs and manas
(*c*) Class of 7 : Buddhi, Ahaṃkāra and five Tanmātras
(*d*) Mūlaprakṛti

Choose from the following options :

| | (1) | (2) | (3) | (4) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*b*) | (*c*) | (*d*) | (*a*) |
| (B) | (*a*) | (*c*) | (*b*) | (*d*) |
| (C) | (*c*) | (*d*) | (*b*) | (*a*) |
| (D) | (*d*) | (*c*) | (*b*) | (*a*) |

65. जैनदर्शनानुसार पंचेंद्रिय त्रस-जीवांची उदाहरणे काय असू शकतात ?
(A) सूक्ष्म जीवाणू
(B) मुंग्या
(C) किडे
(D) मानवप्राणी

66. जोड्या जुळवा :

**चार कारणिक कोटी**

(1) फक्त कारण, कार्य नव्हे
(2) कारण आणि कार्यही
(3) फक्त कार्य
(4) कारणही नाही, कार्यही नाही

**त्या अंतर्गत येणारी सांख्य तत्त्वे**

(*a*) पुरुष
(*b*) सोळांचा वर्ग-5 महाभूते, 5 ज्ञानेंद्रिये, 5 कर्मेंद्रिये आणि मन
(*c*) सातांचा वर्ग-बुद्धि, अहंकार व 5 तन्मात्रे
(*d*) मूलप्रकृती

खालील पर्यायांतून निवड करा :

| | (1) | (2) | (3) | (4) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*b*) | (*c*) | (*d*) | (*a*) |
| (B) | (*a*) | (*c*) | (*b*) | (*d*) |
| (C) | (*c*) | (*d*) | (*b*) | (*a*) |
| (D) | (*d*) | (*c*) | (*b*) | (*a*) |

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



67. In the five-fold classification of *Cittavṛttis* the following is not included by Patañjali :

(A) Pramāṇa

(B) Svapna

(C) Smṛti

(D) Nidrā

68. According to Nyāya, Tarka is :

(A) An independent pramāṇa

(B) Reducible to inference

(C) Hypothetical reasoning used for confirming *pramāṇa*

(D) Method of refutation

69. Consider the following statements about the Vaiśeṣika theory of atom (Paramāṇu) :

(*i*) An atom has circular shape

(*ii*) Atoms of all Mahābhūtas have the same qualities

(*iii*) There are three atoms in one Tryaṇuka

(*iv*) Atoms and Dvyaṇuka cannot be seen by ordinary perception

Choose among the following options :

(A) (*i*) and (*iv*) are true

(B) (*i*) and (*ii*) are true

(C) (*ii*) and (*iii*) are true

(D) All the statements are true

67. चित्तवृत्तींच्या पंचविध वर्गीकरणात पतंजलीने खालील गोष्टीचा समावेश केलेला नाही :

(A) प्रमाण

(B) स्वप्न

(C) स्मृती

(D) निद्रा

68. न्यायदर्शनानुसार तर्क :

(A) हे एक स्वतंत्र प्रमाण आहे

(B) अनुमानात समाविष्ट करता येतो

(C) प्रमाणाला पुष्टी देण्यासाठी वापरला जाणारा सोपाधिक युक्तिवाद असतो

(D) ही खंडनपद्धती असते

69. वैशेषिकांच्या परमाणू सिद्धांताच्या संदर्भात खालील विधाने विचारात घ्या :

(*i*) परमाणू परिमंडलाकार असतो

(*ii*) सर्वमहाभूतांचे परमाणू एकसारखा गुणांचे असतात

(*iii*) एका त्र्यणुकात तीन परमाणू असतात

(*iv*) परमाणू आणि द्वयणुक सामान्य प्रत्यक्षाने दिसू शकत नाहीत

खालील पर्यायांतून निवड करा :

(A) (*i*) आणि (*iv*) सत्य आहेत

(B) (*i*) आणि (*ii*) सत्य आहेत

(C) (*ii*) आणि (*iii*) सत्य आहेत

(D) सर्व विधाने सत्य आहेत

Prepp
Your Personal Exams Guide



70. Prabhākara's view about the relation between word-meaning and sentence-meaning is known as :

(A) Anvitābhidhānavāda

(B) Sphoṭavāda

(C) Apohavāda

(D) Abhihitānvayavāda

71. The opposite that is not included in the list of 10 opposites stated by Pythogoras is :

(A) Limited and Unlimited

(B) Odd and Even

(C) Right and Left

(D) Right and Wrong

72. According to Socrates knowledge is acquired through :

(A) Perception

(B) Faith

(C) Both perception and concepts

(D) Concepts

70. शब्दार्थ आणि वाक्यार्थ यांच्यातील संबंधाच्या बाबतीत प्रभाकरांचा दृष्टिकोन या नावाने ओळखला जातो—

(A) अन्विताभिधानवाद

(B) स्फोटवाद

(C) अपोहवाद

(D) अभिहितान्वयवाद

71. पायथागोरसने प्रतिपादन केलेल्या दहा विरोधांच्या यादित समाविष्ट नसलेला विरोध म्हणजे—

(A) मर्यादित आणि अमर्यादित

(B) विषम आणि सम

(C) उजवे आणि डावे

(D) योग्य आणि अयोग्य

72. सॉक्रेटिसच्या मते ज्ञान ..............च्या द्वारे संपादिले जाते.

(A) प्रत्यक्ष

(B) श्रद्धा

(C) प्रत्यक्ष आणि श्रद्धा दोन्ही

(D) संकल्पना

73. Plato's ............ illustrates the path from ignorance to enlightenment.

(A) Parable of the Good

(B) Simile of the sun

(C) Allegory of the cave

(D) Apology

74. "Universals are not independent entities. They exist in particular objects rather than in a separate realm", is the view of :

(A) Plato

(B) Aristotle

(C) Hegel

(D) Heraclitus

75. "I know that I am, I also know that I know. And when I love both to be and to know, then I add to things I know a third and equally important knowledge. The fact that I love." This is stated in "City of God" by ........

(A) St. Augustine

(B) Descartes

(C) St. Anselm

(D) Thales

73. प्लेटोचे .................... अज्ञानाकडून प्रज्ञेकडे जाणारा मार्ग स्पष्ट करते.

(A) शुभची बोधकथा

(B) सूर्याची उपमा

(C) गुहेचे रूपक

(D) माफी

74. ''सामान्य स्वतंत्र वस्तू नाहीत. सामान्ये वेगल्या, जगात अस्तित्वात नसतात तर विशिष्ट वस्तूतच अस्तित्वात असतात.'' हा दृष्टिकोन आहे ........... चा.

(A) प्लेटो

(B) ॲरिस्टॉटल

(C) हेगेल

(D) हिरॉक्लिटस्

75. मला हे ज्ञात आहे की मी आहे, आणि हे हा ज्ञात आहे की मला ज्ञान आहे. माझे असणे आणि त्याचे ज्ञान असणे हे दोन्ही मला आवडते, तेव्हा मी त्यात यांच्या इतक्याच महत्त्वाच्या तिसऱ्या ज्ञानाची भर घालतो की मला आवडते ही वस्तुस्थिती आहे''. ''सिटी ऑफ गॉड'' यात हे प्रतिपादन केले आहे :

(A) सेंट ऑगस्टिन

(B) देकार्त

(C) सेंट अन्स्लेम

(D) थेल्स

76. Which of the following is applicable to Descartes ?
(A) "It doubt" cannot be doubted
(B) "I doubt" can be doubted
(C) "I doubt" can be doubted sometimes
(D) "I exist therefore God exists"

77. According to Leibnitz, the necessary and eternal truths are known by :
(A) Sensation
(B) Intuition
(C) Mystic experience
(D) Reason

78. Berkeley said his house continued to exist even when he wasn't perceiving it, because :
(A) The substance does not depend on the properties
(B) He was thinking of it
(C) God perceived it
(D) The house was invisible

76. खालीलपैकी कोणते देकार्तच्या संदर्भात लागू होईल ?
(A) ''मी संशय करतो'' ह्या विषयी संशय करता येत नाही
(B) ''मी संशय करतो'' ह्या विषयी संशय शक्य आहे
(C) ''मी संशय करतो'' ह्या विषयी कधी कधी संशय घेता येईल
(D) ''मी अस्तित्वात आहे म्हणून ईश्वर अस्तित्वात आहे''

77. लायब्निझच्या मतानुसार, अनिवार्य आणि शाश्वत सत्याचे ज्ञान ................. द्वारे होते.
(A) संवेदना
(B) अंत:प्रज्ञा
(C) गूढानुभूती
(D) बुद्धी

78. बर्कले असे म्हणतात की घराचा अनुभव घेत नसताना सुद्धा त्यांचे घर सतत अस्तित्वात असते, कारण .................
(A) द्रव्य हे गुणधर्मावर आश्रित नसते
(B) ते घराचा विचार करीत असतात
(C) ईश्वराला त्याचे प्रत्यक्ष ज्ञान होत असते
(D) घर अदृश्य असते

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



79. According to David Hume, the fundamental difference between impressions and ideas is :

(A) Impressions are innate, ideas are not

(B) Impressions are real and ideas are imagination

(C) Ideas are more vivid and forceful than impressions

(D) Impressions are more vivid and forceful than ideas

80. According to Kant ............ is not an empirical concept from sense experience.

(A) Space

(B) Colour

(C) Taste

(D) Material objects

81. The concept of Svadharma is like :

(A) Mill's utlitarianism

(B) Kant's deontological ethics

(C) Bradley's idea of "My station and its duties"

(D) Bentham's Hedonism

79. डेव्हिड ह्यूमचा मतानुसार, ठसे आणि कल्पना यांतील मूलभूत भेद असा आहे ............

(A) ठसे उपजत असून, कल्पना मात्र तशा नाहीत

(B) ठसे वास्तव असतात आणि कल्पना ह्या काल्पनिक असतात

(C) कल्पना ठशांपेक्षा जास्त स्पष्ट आणि प्रखर असतात

(D) ठसे कल्पनांपेक्षा अधिक स्पष्ट आणि प्रखर असतात

80. कांटच्या मतानुसार ................ इंद्रियानुभवातून मिळणारी आनुभविक संकल्पना नाही.

(A) अवकाश

(B) रंग

(C) चव

(D) भौतिक वस्तू

81. स्वधर्माची संकल्पना कशासारखी आहे ?

(A) मिल्लचा उपयुक्ततावाद

(B) कांटचे तत्वयवादी नीतिशास्त्र

(C) ब्रॅडलीची "माझे स्थानक व त्याची कर्तव्ये" ही कल्पना

(D) बेंथमचा सुखवाद

Prepp
Your Personal Exams Guide



82. In Indian ethics purity of means is insisted by :

(A) K. C. Bhattacharya

(B) M. N. Roy

(C) J. Krishnamurti

(D) Mahatma Gandhi

83. In the Bhagavadgītā, Sthitaprajña is said to be like :

(A) Tortoise and ocean

(B) Tortoise and cow

(C) Ocean and stream

(D) Tortoise, cow and ocean

84. The concept of 'Ṛta' is closely related to the concept of :

(A) Dhyāna

(B) Samādhi

(C) Satya

(D) Asteya

85. The concept of Brahmavihāras as Maitri, etc. is stated in :

(A) Yoga as well as Buddhism

(B) Yoga as well as Cārvāka philosophy

(C) Cārvāka philosophy

(D) Bhagavadgītā

82. भारतीय नीतिशास्त्रात साधनशूचितेचा आग्रह कोणी धरला ?

(A) के. सी. भट्टाचार्य

(B) एम. एन. रॉय

(C) जे. कृष्णमूर्ती

(D) महात्मा गांधी

83. भगवद्‌गीतेत म्हटल्याप्रमाणे, स्थितप्रज्ञ कोणासारखा असतो ?

(A) कासव आणि समुद्र

(B) कासव आणि गाय

(C) समुद्र आणि ओढा

(D) कासव, गाय आणि समुद्र

84. 'ऋत' ही संकल्पना कोणत्या संकल्पनेशी निगडित आहे ?

(A) ध्यान

(B) समाधी

(C) सत्य

(D) अस्तेय

85. ब्रह्मविहाराची मैत्र्यादि संकल्पना कशात आढळते ?

(A) योग व बौद्धवादातही

(B) योग व चार्वाक तत्त्वज्ञानातही

(C) चार्वाक तत्त्वज्ञानामध्ये

(D) भगवद्‌गीतेत

www.prepp.in



86. Kaivalya is Sādhya, in Pātañjala-Yoga and Sādhana is :

(A) eightfold

(B) as we wish

(C) God's wish

(D) accidental

87. Jainism maintains that the goal of life is :

(A) Dharma

(B) Artha

(C) Kāma

(D) Mokṣa

88. Kāma is the fruit of :

(A) Artha and Dharma

(B) Artha and Moksa

(C) Dharma and Moksa

(D) Dharma, Artha and Moksa

86. पातंजलयोगात साध्य आहे कैवल्य आणि साधन आहे :

(A) अष्टांग

(B) आपली मर्जी

(C) ईश्वरेच्छा

(D) यादृच्छिक/आकस्मिक

87. जैनमतानुसार जीवनाचे ध्येय (साध्य) होय :

(A) धर्म

(B) अर्थ

(C) काम

(D) मोक्ष

88. काम हे कशाचे फळ असते ?

(A) अर्थ व धर्म

(B) अर्थ व मोक्ष

(C) धर्म व मोक्ष

(D) धर्म, अर्थ व मोक्ष

www.prepp.in



89. Match the pairs :

**List I**

(*a*) Yājñavalkya
(*b*) Lord Kṛṣṇa
(*c*) Yama
(*d*) Uddālaka

**List II**

(*i*) Nachiketa
(*ii*) Gārgī
(*iii*) Śvetaketu
(*iv*) Arjuna

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*ii*) | (*iv*) | (*iii*) | (*i*) |
| (B) | (*ii*) | (*iv*) | (*i*) | (*iii*) |
| (C) | (*ii*) | (*i*) | (*iv*) | (*iii*) |
| (D) | (*i*) | (*iv*) | (*iii*) | (*ii*) |

90. Which hedonistic dimension gets highlighted by a dictum "Pigeon of today is better than a peacock of tomorrow" ?

(A) Fecundity
(B) Propinquity
(C) Certainty
(D) Purity

89. जोड्या जुळवा :

**सूची I**

(*a*) याज्ञवल्क्य
(*b*) भगवान श्रीकृष्ण
(*c*) यम
(*d*) उद्दालक

**सूची II**

(*i*) नचिकेत
(*ii*) गार्गी
(*iii*) श्वेतकेतु
(*iv*) अर्जुन

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*ii*) | (*iv*) | (*iii*) | (*i*) |
| (B) | (*ii*) | (*iv*) | (*i*) | (*iii*) |
| (C) | (*ii*) | (*i*) | (*iv*) | (*iii*) |
| (D) | (*i*) | (*iv*) | (*iii*) | (*ii*) |

90. ''आजचे कबूतर उद्याच्या मोरापेक्षा बरे'' ह्या तत्त्वात सुखवादाचा कोणता पैलू अधोरेखित होतो ?

(A) सामीप्यता
(B) उत्पादकता
(C) शाश्वती
(D) शुद्धता

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



91. The term 'Right' is derived from .......
(A) 'Rare'
(B) 'Retina'
(C) 'Rain'
(D) 'Rectus'

92. Reformative theory of punishment is also known as ................ theory.
(A) Preventive
(B) Logical
(C) Educative
(D) Philosophical

93. Which, among the following philosophers, is not moral definist philosopher ?
(A) Mill
(B) Bentham
(C) Moore
(D) Spencer

94. Which of the following are types of Deontological theories ?
(A) Moral and non-moral
(B) Philosophical and non-philosophical
(C) Act-deontological and rule-deontological
(D) Traditional and modern

91. 'योग्य' या पदाचा उगम ............ यातून झाला आहे.
(A) रेयर
(B) रेटीना
(C) रेन
(D) रेक्टस्

92. शिक्षेच्या सुधारणावादी सिद्धांताची ओळख अशी सुद्धा आहे ....................
(A) बचावात्मक
(B) तार्किकीय
(C) बोधप्रद
(D) तत्त्वज्ञानात्मक

93. खालील तत्त्वज्ञांपैकी कोण नैतिक व्याख्यावादी तत्त्वज्ञ नाही ?
(A) मिल
(B) बेंथम
(C) मूर
(D) स्पेन्सर

94. खालीलपैकी कोणत्या उपपत्त्या कर्तव्यवादी उपपत्त्यांच्या प्रकारांपैकी आहे ?
(A) नैतिक आणि न-नैतिक
(B) तत्त्वज्ञानात्मक आणि न-तत्त्वज्ञानात्मक
(C) कृती-कर्तव्यवादी आणि नियम-कर्तव्यवादी
(D) पारंपरिक आणि आधुनिक

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



95. Whom according to the following thinkers, "the study of what is right or good in conduct is Ethics" ?
    (A) Mackenzie
    (B) Muirhead
    (C) William James
    (D) Sidgwick

96. The principle of "Tit for Tat" is included in ..............
    (A) The Deterrent theory
    (B) The Reformative theory
    (C) The Retributive theory
    (D) The Naturalist theory

97. "It is worse for a man to do wrong than to suffer wrong" is a statement by .......................
    (A) Socrates
    (B) Plato
    (C) Aristotle
    (D) Anselm

98. Bentham's Hedonism is ............. .
    (A) Quantitative
    (B) Qualitative
    (C) Cognitive
    (D) Rational

95. खालीलपैकी कोणत्या विचारवंतानुसार ''नीतिशास्त्र म्हणजे आचरणात काय योग्य आणि शुभ आहे याचे अध्ययन ?
    (A) मॅकेन्झी
    (B) म्युरहेड
    (C) विलियम जेम्स
    (D) सिज्विक

96. 'जशास तसे' ह्या तत्त्वाचा समावेश ह्यात होतो ...................... .
    (A) प्रतिबंधात्मक उपपत्ती
    (B) सुधारणावादी उपपत्ती
    (C) प्रतिशोधात्मक उपपत्ती
    (D) निसर्गवादी उपपत्ती

97. 'वाईट गोष्टींचा त्रास होण्यापेक्षा अयोग्य कृती करणे अत्यधिक वाईट आहे' हे कथन यांचे आहे :
    (A) सॉक्रेटिस
    (B) प्लेटो
    (C) ॲरिस्टॉटल
    (D) ॲन्सेल्म

98. बेंथमचा सुखवाद असा आहे :
    (A) संख्यात्मक
    (B) गुणात्मक
    (C) ज्ञानात्मक
    (D) बौद्धिक

www.prepp.in



99. Match the List-I of authors with the List-II of philosophical work done by them and mark the correct code :

**List I**

(*i*) G. E. Moore

(*ii*) A. J. Ayer

(*iii*) C. L. Stevenson

(*iv*) R. M. Hare

**List II**

(*a*) Language of Morals

(*b*) Principia Ethica

(*c*) Ethics and Language

(*d*) Language, Truth and Logic

**Codes :**

| | (*i*) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*d*) | (*c*) | (*b*) | (*a*) |
| (B) | (*d*) | (*b*) | (*a*) | (*c*) |
| (C) | (*b*) | (*d*) | (*c*) | (*a*) |
| (D) | (*c*) | (*d*) | (*a*) | (*b*) |

100. Prescriptivism as a metaethical theory is propounded by :

(A) Moore

(B) Ayer

(C) Stevenson

(D) Hare

99. ग्रंथ लेखकांची सूची I आणि त्यांच्या ग्रंथांची सूची II यांच्या जोड्या जुळवा आणि योग्य संकेतांक निवडा :

**सूची I**

(*i*) जी. ई. मूर

(*ii*) ए. जे. एयर

(*iii*) सी. एल. स्टिव्हंसन

(*iv*) आर. एम. हेयर

**सूची II**

(*a*) लँग्वेज ऑफ मॉरल्स

(*b*) प्रिंसिपिया एथिका

(*c*) एथिक्स एन्ड लँग्वेज

(*d*) लँग्वेज ट्रुथ एन्ड लॉजिक

**संकेतांक :**

| | (*i*) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*d*) | (*c*) | (*b*) | (*a*) |
| (B) | (*d*) | (*b*) | (*a*) | (*c*) |
| (C) | (*b*) | (*d*) | (*c*) | (*a*) |
| (D) | (*c*) | (*d*) | (*a*) | (*b*) |

100. आदेशवाद या अधिनीतिशास्त्रीय उपपत्तीची प्रथम प्रस्तुती यांनी केली :

(A) मूर

(B) एयर

(C) स्टिव्हंसन

(D) हेयर

www.prepp.in



## ROUGH WORK

Your Personal Exam Guide